औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची सोमवार दिनांक २९.३.९३ रोजी झालेल्या ८० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री. ईश्वर भोसीकर — सभापती औरंगाबाद मंडळ

२. श्री. भास्कर मुंढे — उपसभापती औरंगाबाद मंडळ

३] श्री. व्यकंटराव देशपांडे — सदस्य, औरंगाबाद मंडळ

४] श्री. दे. हि. मुन, उपसंचालक नगररचना विभाग औरंगाबाद. — सदस्य, औरंगाबाद मंडळ.

विषय क्र. १: दिनांक २०.३.९३ रोजी झालेल्या ७९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

---

सदर विषयावर चर्चा करतांना दिनांक २०.३.९३ च्या बैठकीतील विषय क्र. ६[१] व ठराव क्र. ४७८ वर चर्चा करतांना उपसभापती श्री. मुंढे यांनी मंडळास माहिती दिली की, गंगापूर येथील पूरग्रस्तासाठी १३९ गाळयाच्या निविदासंबंधी मंडळाने घेतलेल्या निर्णयासंबंधी सभापती औरंगाबाद मंडळ यांनी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांच्याशी दुरध्वनीवर चर्चा केली व त्यांनी या प्रकरणात असलेली सर्व कागदपत्रे मुंबई येथे पाठविण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना सदर प्रकरणातील सर्व कागदपत्र पाठविण्यांत आली.

त्यावर उपाध्यक्ष/प्रा. यांनी गंगापूर येथील १३९ गाळयासाठी कमी दराची प्राप्त झालेली निविदा स्विकारण्याचा सल्ला दिला असल्याचे सभापतींनी सांगितले. उपाध्यक्ष/प्रा. यांचे पत्र मंडळास वाचून दाखविले. मंडळाच्या सदस्यांनी औरंगाबाद मंडळाने उपाध्यक्ष/प्रा. यांनी पाठविलेल्या पत्राची मागणी केली सदर पत्र मंडळाचे सदस्य श्री. दे. ही. मुन उपसंचालक, नगररचना यांनी वाचले.

त्यावर उपसंचालक नगर रचना यांनी प्रतिपादन केले की, उपाध्यक्ष/प्रा. यांनी निविदा स्विकारण्याचे आदेश दिलेले नाहीत फक्त सल्ला दिला आहे.

चर्चेत भाग घेतांना मंडळाचे सदस्य श्री. व्यकंटराव देशपांडे यांनी प्रतिपादन केले की, मंडळाने ~~xxxx~~ निविदा रद्द करण्याचा

ठराव मंजूर केला असतांना प्रकरण प्राधिकरणाकडे कसे काय गेले ?.

यावर मंडळाचे सदस्य श्री. मून यांनी प्रतिपादन केले की, प्राधिकरणास ~~सर्व~~ फक्त प्रकरणाची वस्तुस्थिती कळविली आहे.

ठेकेदाराचे कामाचे बाबतीत मंडळाचे कार्यकारी अभियंता यांना विचारले असतांना कार्यकारी अभियंता औरंगाबाद विभाग यांनी असे सांगितले की, ठेकेदाराचे सिडको येथे चालु असलेल्या कामाची गती आहे. जेवढया किंमतीचे काम असेल व जेवढा कालावधी दिला असेल तेवढा त्याचा वेग असू शकेल.

उपसभापती व मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, मंडळाने सिडकोला पत्र पाठवून इमारत बांधकामाचा निविदा प्राप्तीचा मार्केट ट्रेंड काय आहे याची विचारणा केली व सिडकोकडे सध्या प्राप्त निविदा ७.०८६% कमी दराची आहे असे उत्तर सिडकोकडून प्राप्त झाले आहे ते पटलावर सादर करण्यांत आले आहे. सदर ठेकेदाराकडे अनुभव कमी आहे व कामाचा वेग कमी आहे म्हणून काम नाकारणे योग्य होणार नाही.

चर्चेच्या दरम्यान मा. सभापतींनी असे सांगितले की, ठेकेदाराने काम चांगले व वेळेत करण्याचे लेखी पत्र दिले असून प्रत्येक महिन्यास रू. ३ लाखाचे काम करुन दाखवू शकेन असा विश्वास दिला आहे. तसेच कमी दराची निविदा स्विकारल्यास लाभार्थीवर कमी आर्थिक बोजा पडेल.

चर्चेत भाग घेतांना मंडळाचे सदस्य श्री. देशपांडे यांनी प्रतिपादन केले की, कमी दराची निविदा रद्द करुन परत निविदा बोलवाव्यात. पुन्हा निविदा बोलविल्यास ५.५४% पेक्षा ही कमी दराच्या निविदा प्राप्त होऊ शकतील.

...३

यावर उपसंचालक नगररचना श्री. मुन यांनी सांगितले की, परत निविदा बोलविण्याचा प्रश्नच येत नाही.

यावर सभापतींनी सांगितले की, निविदा बोलविता येत नाहीत. निविदा परत बोलविल्यास काम सुरु करण्यास विलंब होईल व निम्नतम निविदाधारकास काम न दिल्यास लोक लेखा समितीचा आक्षेप येण्याची शक्यता आहे व त्यास उत्तर देतांना अडचणी येतील.

सभापतींनी मंडळाच्या सदस्यांना परिस्थितीची जाणीव करुन दिली की, ही पुरग्रस्तांची योजना आहे. यापूर्वी मंडळाने १५,००० रुपयात घरे बांधून दिलेली आहेत. गंगापूर येथील योजनेसाठी कर्जाशिवाय लाभार्थीकडून पैसे घ्यावयाचे आहे व हे शासनाने मंडळावर सोपविलेले काम असल्याने शासनाचे ऐकले पाहिजे असे सभापतींनी सांगितले. या कामासाठी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त हे वारंवार विचारणा करीत आहे. त्यामुळे हे काम विशेष बाब म्हणून त्वरीत करावयाचे आहे. पुन: निविदा मागविल्यास काम पावसाळ्यानंतर सुरु होईल व विलंब फार होईल. म्हणून निम्नतम निविदाधारकास काम द्यावे असा प्रस्ताव मा. सभापतींनी मांडला.

ठराव क्र. ४७९

वरील चर्चेनंतर सर्व सदस्यांनी बहुमताने असा निर्णय घेतला की, मे. अेस. अेम. कन्स्ट्रक्शन्स यांची निम्नतम, ५. ५४% कमी दराची निविदा स्विकारावी व या कामास लवकर सुरुवात करुन वेळीच्या आत कामे पूर्ण करण्याची काळजी संबंधीतांनी घ्यावी अशी ही सूचना केली.

....

दिनांक २०. ३. ९३ च्या ७९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ४८०

दिनांक २०. ३. ९३ च्या ७९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर मंडळाच्या सदस्यांनी चर्चा करुन सदर कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.